निवडक



हरमल : खालचावाडा येथील श्री नारायण देव मंदिरात श्री रामजन्म पाळणा गीते गाताना महिला वर्ग.

## हरमल नारायण मंदिरात रामनवमी साजरी

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ७ : खालचावाडा येथील श्री नारायण देव मंदिरात श्री रामनवमी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वाड्यावरिल महिला,पुरुष तसेच श्री नारायण देव देवस्थान समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी श्री राम जन्माची पाळणा गीते गायिली. देवस्थानचे अध्यक्ष राजेश गोकर्णकर आदींनी स्वागत केले व नंतर आरती व महाप्रसाद झाला.संध्याकाळी ह.भ.प विष्णूबुवा शेटगावकर यांचे सुश्राव्य कीर्तन झाले, त्यांना प्रभाकर गावकर व अजित शेटगावकर यांनी साथसंगत केली. अध्यक्ष राजेश गोकर्णकर यांनी आभार मानले.

---



नानोडा : सातेरी देवीच्या कळसाची विधिवत पूजा केल्यानंतर गावकरी व भाविक.

## नानोडा येथे कलसोत्सव साजरा

टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ७** : नानोडा – डिचोली येथील ग्रामदेवी श्री सातेरी देवीच्या कलसोत्सवाने गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर भाविकांना न्हावन (तीर्थ) देवून उत्साहात सांगता झाली. कळसाची श्री सातेरी देवी आणि श्री शांतादुर्गा मंदिरात मंदिराच्या पुरोहिताकडून विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर कळसाची गावातील मानकऱ्यांकडून घरात पूजा केल्यानंतर कळस गावात फिरविण्यात आला. काही ठिकाणी घरातील मंडळीकडून कळसाची विधिवत पूजा करण्यात आली. गावकरी मंडळीचा मान सन्मान करण्यात आला. रात्रभर कळस गावात फिरवून झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी कळसाचे श्री सातेरी देवी चरणी विधिवत आगमन झाले तदनंत सांगता झाली.

---

## साहिल प्रकाशनच्या प्रज्ञाशोध परीक्षेचा निकाल जाहीर

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ७** : साहिल प्रकासनने घेतलेल्या 'प्रज्ञाशोध परिक्षा २०२५' चा निकाल जाहीर झाला असून, गौतम कर्पे आणि वरद परब गावकर यांनी प्रथम पारितोषिक पटाकाविले. तर विधी गावकर, आराध्या सावईकर, गार्गी पेंडसे, सान्वी लोटलीकर यांनी द्वितीय, ईश्वरी राऊत, सौमित्र ढोरे यांना तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. संकल्प गोंडलकर, आयुष कोळंबकर, इशान नाईक, सार्थक सिनारी, वेद नाईक, सुरेश गवंडी, श्लोक जोशी, अनघा कुलकर्णी, प्रणया नार्वेकर यांना उत्तेजनर्थ पारितोषिके मिळाली असे साहिल प्रकाशनचे प्रकाशन निलेश बुगडे यांनी कळविले आहे.

---

## कांदोळी येथील स्वामी समर्थ मठाच्या वर्धापनदिनानिमित्त १२ पासून कार्यक्रम

टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ७** : कांदोळी येथील श्री स्वामी समर्थ मठाचा आठवा वर्धापनदिन आराडीवाडी कांदोळी येथील श्री स्वामी समर्थ मठाचा आठवा वर्धापन महोत्सव शनिवार दि. १२ व रविवार दि. १३ रोजी असा दोन दिवस विविध कार्यक्रम व धार्मिक अनुष्ठानसह साजरा होणार आहे.
शनिवार दि. १२ रोजी श्री. व सौ. प्रिया राजू जाधव, श्री. व सौ. सुवर्णा रमेश नाईक, श्री. व सौ. निकिता आदित्य सकपाळ, श्री. व सौ. काजल नितीन पाटील आणि श्री. व सौ. स्मिता योगेश वेलैकर या यजमान मंडळकडून महागणेश प्रार्थना श्रीराम अभिषेक आणि पार पडतील, त्यानंतर दुपार एक वाजता आरत्या व महाप्रसाद होईल, त्यानंतर ४ वाजता हनुमान चालीसा स्तोत्र जोडवी दिवजोसव (६ वाजता )नंतर श्रीची पालखीने मिरवणूक काढण्यात येईल. संध्याकाळी ७.३० वाजता असे नीलेश वेर्णेकर आणि साथीदार यांच्या स्वामी समर्थ भजनी मंडळ शिवोली यांच्यातर्फे आरत्यांचे सादरीकरण होईल, त्यानंतर महाप्रसादचा कार्यक्रम होईल. दुसऱ्या दिवशी रविवार दि. १३ रोजी श्री दत्त पद्मनाभ पीठ संचालित संत समर्थे ८ वाजता संत समागम चा कार्यक्रम होणार आहे. सकाळी यजमान श्री रसिका रमेश बाळे यांच्या हस्ते सद्गुरू पूजन होणार आहे, तरी सर्व भावी मंडळींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून वर्धापन दिनाच्या महोत्सव आणावी, असे ही स्वामी समर्थ मठातर्फे आवाहन करण्यात येत आहे.

# हॅरी ब्रूक इंग्लंडच्या कर्णधारपदी

▸ माघार घेतल्यामुळे दोन वर्षांच्या बंदीची कारवाई

**नवी दिल्ली, दि. ७ :**



लिलावात संघाने खरेदी केल्यानंतर माघार घेतल्यामुळे दोन वर्षांच्या बंदीच्या कारवाईला सामोरं जाणारा हॅरी ब्रूक आता इंग्लंडचा कर्णधार असणार आहे. इंग्लंड क्रिकेट बोर्डाने ब्रूकची वनडे आणि टी२० संघाच्या कर्णधारपदी नियुक्तीची घोषणा केली.

फेब्रुवारी महिन्यात झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत इंग्लंडच्या संघाला प्राथमिक फेरीतूनच गाशा गुंडाळावा लागला होता. त्यानंतर कर्णधार जोस बटलरने कर्णधारपद सोडण्याचा निर्णय घेतला होता.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेत बटलरच्या अनुपस्थितीत त्याने संघाचं नेतृत्वही केलं होतं. आता त्याची कर्णधारपदी औपचारिक निवड झाली आहे. मे महिन्यात इंग्लंडचा संघ वेस्ट इंडिजविरुद्ध वनडे आणि टी२० मालिका खेळणार आहे. ब्रुकसाठी पूर्णवेळ कर्णधार म्हणून ही पहिली मालिका असेल.


इंग्लंडचा कर्णधार म्हणून नियुक्ती होणं हा अतिशय सन्मानाचा क्षण आहे. या जबाबदारीला न्याय देण्याचा पुरेपूर प्रयत्न असेल', असं ब्रूकने म्हटलं आहे. २०२२ मध्ये ब्रुकने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं. टेस्ट, वनडे तसंच टी२० अशा तिन्ही प्रकारात त्याने आपल्या बॅटची ताकद दाखवली. ब्रुकने २४ टेस्ट, २६ वनडे आणि ४४ टी२० सामन्यात इंग्लंडचं प्रतिनिधित्व केलं आहे. टेस्ट क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यापासून नऊ इनिंग्जमध्ये ब्रुकने ८०९ धावा केल्या. टेस्ट क्रिकेटमध्ये हा नवा विक्रम आहे.

आयपीएल स्पर्धेत २०२२ मध्ये सनरायझर्स हैदराबादने ब्रुकला १३.२५ कोटी रुपये खर्चून ताफ्यात समाविष्ट केले. १४ एप्रिल रोजी ब्रुकने कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध खेळताना शतकी खेळी साकारली. एका हंगामानंतर हैदराबादने त्याला रिलीज करण्याचा निर्णय घेतला. काही महिन्यांपूर्वी झालेल्या लिलावात दिल्ली कॅपिटल्स संघाने ६.२५ कोटी रुपये देऊन ब्रुकला संघात घेतलं. दिल्ली संघाची नव्याने बांधणी होत होती. ब्रूक दिल्लीचा कर्णधार असेल अशा चर्चाही रंगू लागल्या आहेत. मात्र चॅम्पियन्स ट्रॉफीत सर्वसाधारण कामगिरीनंतर जोस बटलरने कर्णधारपद सोडले. टेस्टचा कर्णधार बेन स्टोक्स दुखापतीमुळे वनडे आणि टी२० खेळू शकेल का याविषयी साशंकता होती. माजी कर्णधार जो रूटने कर्णधारपदात स्वारस्य नसल्याचं स्पष्ट केले होते. यामुळे ब्रूकचीच इंग्लंडच्या कर्णधारपदी निवड होईल हे दिसत होतं. सोमवारी यासंदर्भात औपचारिक घोषणा झाली.

दरम्यान लिलावात संघाने विकत घेतल्यानंतर माघार घेतल्यामुळे ब्रूकवर आयपीएल स्पर्धेत दोन वर्ष न खेळण्याची बंदी ठोठावण्यात आली आहे. आयपीएल गव्हर्निंग काऊंसिलसने यासंदर्भात नियम यंदाच्या हंगामापासून लागू केला. खेळाडूंना लिलावात घेतले जाते मात्र ते आयत्यावेळी माघार घेतात. यामुळे संघांचे नुकसान होते. त्याच क्षमतेचा पर्यायी खेळाडू मिळणंही कठीण होतं.

# इशांत शर्मावर आयपीएल नियम उल्लंघनाचे आरोप

**मुंबई, दि. ७ :**



भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने गुजरात टायटन्सचा गोलंदाज इशांत शर्माला आयपीएल नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल त्याच्या मॅच फीच्या २५ टक्के दंड आणि एक डिमेरिट पॉइंट ठोठावला आहे.

गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यातील सामन्यादरम्यान इशांत शर्माविरुद्ध ही कारवाई झाली. इशांत शर्माला कलम २.२ अंतर्गत दोषी ठरवण्यात आले आहे. त्याने त्याची चूक मान्य केली आहे. आयपीएलच्या निवेदनात म्हटले आहे की, इशांत शर्माने कलम २.२ अंतर्गत लेव्हल १ चा गुन्हा स्वीकारला आणि मॅच रेफरीचा निर्णय स्वीकारला.

बीसीसीआयच्या नियमाच्या कलम २.२ मध्ये सामान्य क्रिकेट क्रियाकलापाबाहेरील कोणतीही कृती, जसे की विकेट मारणे किंवा लाथ मारणे आणि जाणूनबुजून, बेपर्वाईने किंवा निष्काळजीपणे (कोणत्याही परिस्थितीत जरी अपघाती असले तरी) जाहिरात फलक, सीमा कुंपण, ड्रेसिंग रूमचे दरवाजे, आरसे, खिडक्या आणि इतर कोणत्याही गोष्टींना नुकसान पोहोचवणारी कोणतीही कृती समाविष्ट आहे. उदाहरणार्थ, जर एखादा खेळाडू निराशेने बॅट फिरवतो आणि जाहिरात बोर्डला नुकसान पोहोचवतो तर हा गुन्हा होऊ शकतो.

या सामन्यात इशांत शर्माला कोणतेही यश मिळाले नाही. त्याने ४ षटकांत १३.२५ च्या इकॉनॉमीने ५३ धावा दिल्या. त्याच्या षटकात ९ चौकार आणि १ षटकार होता.

आयपीएल–१८ च्या २० व्या सामन्यात गुजरात टायटन्सने सनरायझर्स हैदराबादचा ७ विकेट्सने पराभव केला. राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना ८ विकेटच्या मोबदल्यात १५२ धावा केल्या. नितीश कुमार रेड्डी (३१ धावा) आणि हेनरिक क्लासेन (२७ धावा) यांनी धावा केल्या. गुजरातकडून सिराजने ४ विकेट्स घेतल्या. गुजरातने १६.४ षटकांत ३ गडी गमावून १५३ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. कर्णधार शुभमन गिलने ६१ धावांची नाबाद खेळी केली, तर शेरफेन रुदरफोर्डने ३५ धावांवर नाबाद राहिली. वॉशिंग्टन सुंदरने ४९ धावा केल्या.

# हैदराबादने सलग चौथा सामना गमावला

▸ कॅप्टन शुभमन गिलचे अर्धशतक : मोहम्मद सिराजने घेतल्या ४ विकेट्स

**हैदराबाद, दि. ७ :**

सनरायझर्स हैदराबादला आयपीएल २०२५ मध्ये सलग चौथा पराभव पत्करावा लागला आहे. गुजरातने हैदराबादचा ७ गडी राखून पराभव केला. गुजरातने सलग तिसरा सामना जिंकला आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर गुजरातने १५३ धावांचे लक्ष्य १६.४ षटकांत ३ गडी गमावून पूर्ण केले. कर्णधार शुभमन गिलने ६१ धावांची नाबाद खेळी केली. तर शेरफेन रुदरफोर्ड ३५ धावांवर नाबाद राहिला. वॉशिंग्टन सुंदरने ४९ धावा केल्या. मोहम्मद शमीने २ विकेट घेतल्या, तर कर्णधार पॅट कमिन्सने १ विकेट घेतली.

गुजरातने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हैदराबादने २० षटकांत ८ गडी गमावून १५२ धावा केल्या. नितीश कुमार रेड्डी (३१ धावा) आणि हेनरिक क्लासेन (२७ धावा) यांनी एकमेव अर्धशतक भागीदारी केली. मोहम्मद सिराजने ४ विकेट्स घेतल्या. प्रसिद्ध कृष्णा आणि साई किशोर यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

गुजरातने सलग तिसरा सामना जिंकला आहे. संघाचे ४ सामन्यांनंतर ६ गुण आहेत. टायटन्स संघ दुसऱ्या स्थानावर आला आहे.

हैदराबादने सलग चौथा सामना गमावला आहे. संघाचे ५ सामन्यांनंतर २ गुण आहेत. सनरायझर्स संघ दहाव्या स्थानावर आहे.

गुजरातने सलग तिसरा सामना जिंकला आहे. संघाने हैदराबादचा ७ गडी राखून पराभव केला. १७ व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर गिलने एक धाव घेत संघाला विजय मिळवून दिला. १५ व्या षटकात, अभिषेक शर्माच्या षटकात शेरफेन रुदरफोर्डने सलग चार चौकार मारले. या षटकातून १८ धावा आल्या. षटकाच्या पाचव्या चेंडूवर, रदरफोर्डची बॅट यष्टिरक्षक हेनरिक क्लासेनच्या पॅडवर लागली आणि नंतर ती स्टंपवर गेली. तथापि, रदरफोर्ड क्रीजच्या आत होता आणि बाद होण्यापासून वाचला.

१४ व्या षटकात गुजरातने तिसरी विकेट गमावली. येथे वॉशिंग्टन सुंदर ४९ धावा करून बाद झाला. मोहम्मद शमीच्या गोलंदाजीवर अनिकेत वर्माने त्याला झेलबाद केले. अनिकेतने पुढे डायव्ह करत एक शानदार झेल घेतला. गुजरातने १३ व्या षटकात १०० धावांचा टप्पा ओलांडला. त्याच षटकात शुभमन गिलने झीशान अन्सारीच्या चेंडूवर चौकार मारून आपले अर्धशतक पूर्ण केले. शुभमन गिल आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी ९व्या षटकात अर्धशतकी भागीदारी पूर्ण केली. कामिंदू मेंडिसच्या दुसऱ्या चेंडूवर चौकार मारून गिलने भागीदारी ५० च्या पुढे नेली. गुजरातने १६ धावांत दोन विकेट गमावल्या होत्या. गुजरातने ८ व्या षटकात ५० धावांचा टप्पा ओलांडला. उनादकटच्या षटकात सुंदरने चौकार मारून संघाला ५० धावांच्या पुढे नेले. या षटकातून ८ धावा आल्या.

सहाव्या षटकात वॉशिंग्टन सुंदरने सिमरजीतच्या षटकातून २० धावा घेतल्या. त्याने पहिल्या दोन चेंडूंवर सलग दोन चौकार मारले, त्यानंतर चौथ्या आणि सहाव्या चेंडूवर षटकार मारले. डावातील पाचवे षटक टाकणाऱ्या मोहम्मद शमीच्या चेंडूवर कर्णधार शुभमन गिलने सलग दोन चौकार मारले. त्याने ५वा आणि ६वा चेंडू सीमारेषेच्या पलीकडे पाठवला. चौथ्या षटकात गुजरातने दुसरी विकेट गमावली. पॅट कमिन्सने जोस बटलरला यष्टीरक्षक हेनरिक क्लासेनकडून झेलबाद केले. बटलरला खातेही उघडता आले नाही. गुजरातने तिसऱ्या षटकात पहिली विकेट गमावली. येथे मोहम्मद शमीने साई सुदर्शनला (५ धावा) अनिकेत वर्माकरवी झेलबाद केले.





मडगाव : स्लग: ड्रीम स्पोर्ट्स राष्ट्रीय फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा.

# ड्रीम स्पोर्ट्स फुटबॉल स्पर्धेच्या मोहिमेला आज सुरुवात करणार

टीम दैनिक हेराल्ड

▸ अंतिम फेरीत देम्पो स्पोर्ट्स क्लब आणि सेसा फुटबॉल अकॅडमीचा सहभाग

**मडगाव, दि. ७** : ड्रीम स्पोर्ट्स फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेच्या दुसऱ्या राष्ट्रीय अंतिम फेरीत गोव्याच्या देम्पो स्पोर्ट्स क्लब आणि सेसा फुटबॉल अकॅडमी या संघांचा सहभाग असून, मंगळवार दि. ८ रोजी त्यांच्या मोहिमा सुरू होणार आहेत. दक्षिण गोव्यात ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

देम्पो संघ आपला सामना चेन्नईयन एफसी विरुद्ध सकाळी ८.३० वाजता उटोर्डा स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सवर खेळेल, तर सेसा संघ संध्याकाळी ५.३० वाजता एसएजी बेनाळीम मैदानावर पंजाब एफसी विरुद्ध खेळणार आहे.

१७ वर्षांखालील वयोगटातील ही फुटबॉल स्पर्धा असून, मुला–मुलींचे प्रत्येकी आठ संघ दोन गटांमध्ये विभागण्यात आले आहेत. गटातील सामने दररोज सकाळी ८.३० आणि संध्याकाळी ५.३० वाजता उटोर्डा स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि एसएजी बेनाळीम मैदानावर खेळवले जाणार आहेत. फायनल सामने एप्रिल १५ रोजी राय फुटबॉल मैदानावर होणार आहेत.

मुलांच्या गट 'अ' मध्ये रिलायन्स फाऊंडेशन यंग चॅम्प्स, चेन्नईयन एफसी, देम्पो स्पोर्ट्स क्लब आणि मोहन बागान सुपर जायंट्स यांचा समावेश आहे. तर गट ब' मध्ये पंजाब एफसी, नॉरविच सिटी एफसी, फुटबॉल ४ चेंज आणि सेसा फुटबॉल अकॅडमी हे संघ आहेत.

इतर सामने एप्रिल ८ रोजी होणार असून, सकाळी ८.३० वाजता बेनाळीम मैदानावर रिलायन्स फाऊंडेशन यंग चॅम्प्स विरुद्ध मोहन बागान सुपर जायंट्स आणि संध्याकाळी ५.३० वाजता उटोर्डा येथे नॉरविच सिटी एफसी विरुद्ध फुटबॉल ४ चेंज यांच्यात सामना होईल.

मुलींच्या गटात गट अ' मध्ये आसाम, झारखंड, गोवा आणि कर्नाटक हे संघ आहेत, तर गट ब' मध्ये केरळ, राजस्थान, ओडिशा आणि दिल्ली हे संघ आहेत.

मुलांच्या गटातील सामने एप्रिल ८, १० आणि १२ रोजी होणार असून, मुलींच्या गटातील सामने एप्रिल ९, ११ आणि १३ रोजी होणार आहेत. दोन्ही गटांमधून विजेता संघ एप्रिल १५ रोजी होणाऱ्या अंतिम सामन्यात प्रवेश मिळवेल.



राय शिवोली : श्री दाडोबा देवस्थानच्या सभा मंडप बांधकामाचे भूमिपूजन प्रसंगी उपस्थित शिवशंकर मयेकर व इतर.

# राय शिवोली येथील दाडोबा देवस्थानच्या सभामंडप बांधकामाचे भूमिपूजन

टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. ७** : राय शिवोली येथील श्री दाडोबा देवस्थानच्या सभा मंडप बांधकामाचे भूमिपूजन सामाजिक कार्यकर्ता शिवशंकर मयेकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे यजमान साईनाथ हरमलकर, उद्योजक परेश रायकर, देवस्थानचे अध्यक्ष विराज वेंगुर्लेकर देवस्थानचे माजी अध्यक्ष अमृत अगरवाडेकर, श्री समर्थ रामदास मठाचे अध्यक्ष सदानंद गोवेकर, समिती सदस्य देवानंद ताम्हणकर, स्थानिक रहिवासी शैलेश मांद्रेकर व इतर मान्यवर उपस्थित होते. देवस्थान सभा मंडप चे बांधकाम हाती घेतल्याबद्दल देवस्थान समितीकडून मयेकर यांचे आभार व्यक्त करण्यात आले. देवस्थानला मदत करण्यासाठी आपण नेहमी तयार असल्याचे हमी शिवशंकर मयेकर यांनी दिली.

# सेंट्रल स्ट्रायकर्स इंदूरने जिंकली ५० प्लस क्रिकोकर्स बिग बॅश

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ७** : सेंट्रल स्ट्रायकर्स इंदूर संघाने ओमटेक्स वेस्टर्न लायन मुंबई संघाचा ८ गडी व ४४ चेंडू राखून पराभव करत क्रिकोकर्स हॉस्पिटॅलिटी गोवा यांनी आयोजित केलेल्या क्रिकोकर्स ५० प्लस क्रिकोकर्स क्रिकेट बॅश स्पर्धेच्या दुसऱ्या हंगामाचे विजेतपद पटकावले.





सेंट्रल स्ट्रायकर्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचे निमंत्रण दिल्यानंतर ओमटेक्स संघाने २० षटकांत ६ बाद १३९ धावा केल्या. त्यांचा यष्टिरक्षक फलंदाज अभिजित कदम याने २४ चेंडूंत ३४ धावांची खेळी केली. संघ ४ बाद ४३ असा संकटात असताना अभिजित व सारंग डेगवेकर (३१ धावा, १६ चेंडू, १ चौकार, ३ षटकार) यांनी पाचव्या विकेटसाठी ४१ धावांची भागीदारी केली. सुनील रहेजा (२० चेंडूंत नाबाद २९ धावा, ४ चौकार, १ षटकार) व राकेश मेहता (१२ चेंडूंत नाबाद १४ धावा) यांनी २३ धावांची अविभक्त भागीदारी केली. इंदूरकडून अजय द्विवेदी याने २४ धावांत २ तर जमिल खान, चंद्रप्रकाश, शेख सादिक व संजय चौबे यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

सेंट्रल स्ट्रायकर्सचे सलामीवीर मनोज कंधारी (५० धावा, २२ चेंडू, ९ चौकार, १ षटकार) व नासिर अली (३१ धावा, २२ चेंडू, ४ चौकार) यांनी केवळ ६ षटकांत ७१ धावांची सलामी देत संघाच्या विजयाचा भक्कम पाया रचला. विनायक सामंत (१८ चेंडूंत २५ धावा, २ चौकार) व संदीप मेहरोत्रा (१४ चेंडूंत नाबाद २४ धावा, ३ चौकार) यांनी ४८ धावांची अभेद्य भागीदारी करत संघाला १२.४ षटकांत २ बाद १४० असे पोहोचवत विजेतेपद मिळवून दिले.

बक्षीस वितरण समारंभाला एमसीसी अध्यक्ष योगेश नाईक, चिराग दत्ता नाईक व सगुण दादा नाईक उपस्थित होते. रघुवीर कुंकळ्येकर, अनुप बोरकर व अमर देविदास उपस्थित होते.

वैयक्तिक बक्षिसे – पराभूत संघातील सर्वोत्तम खेळाडू – अभिजित कदम, विजयी संघातील सर्वोत्तम खेळाडू – मनोज कंधारी, स्पर्धेतील सर्वोत्तम फलंदाज – मकरंद कुलकर्णी (ओमटेक्स वेस्टर्न लायन), स्पर्धेतील सर्वोत्तम गोलंदाज – चंद्रप्रकाश (सेंट्रल स्ट्रायकर्स), स्पर्धेतील सर्वोत्तम अष्टपैलू – सारंग डेगवेकर (ओमटेक्स वेस्टर्न लायन).

# 'नारायण देवस्थानचा इतिहास भावी पिढीसाठी अमूल्य ठेवा'

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ७ : येथील खालचवाडा श्री नारायण देव मंदिर हे पुरातन देवस्थान असल्याची साक्ष आहे.ह्या मंदिर परिसरात भले मोठे दगडी खांब अद्यापही असून,तो जाज्वल्य इतिहास राखून ठेवण्याची गरज असून,त्या खांबाची उभारणी प्रांगणात करण्यासाठी आपले प्रयत्न निश्चित आहेत,असे प्रतिपादन मांद्रे मतदारसंघाचे आमदार तथा गोवा हाउसिंग बोर्डाचे चेअरमन जीत आरोलकर यांनी व्यक्त केले.

श्री रामनवमी निम्मित आयोजित सेवाव्रती ज्येष्ठ नागरिकांच्या सत्कार सोहळ्यात प्रमुख पाहुणे नात्याने बोलत होते. या वाड्यावरील जेस्थ्यानी पुरातन अवशेष तिसऱ्या पिढीपर्यंत राखून ठेवले,हा प्रकार असाच चालू राहिला पाहिजे. या देवस्थानचे अध्यक्ष राजेश गोकर्णकर तरुण असून,त्यांना पूर्ण सहकार्य असेल.ह्या देवस्थांनचा रंगमंच तसेच आणखीन कार्य करण्याची संधी द्यावी,असे आवाहन आमदार जीत आरोलकर यांनी केले.

या देवस्थानचा उत्कर्ष व्हावा यासाठी आपले सहकार्य असेल. मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर हे कार्यक्षम असून मतदारसंघात कमालीच्या उत्साहाने वावरत असून,नेहमीच हसरा चेहरा ही त्यांची खुबी असून, विकासकामांचा ध्यास घेऊनच त्यांचे कार्य चालू आहे. २०२७ च्या निवडणुकीत पुन्हा संधी द्यावी तसेच तरुण अध्यक्ष राजेश गोकर्णकर सारख्या व्यक्तीच्या पाठीशी सर्वांनी एकजुटीने राहण्याचे आवाहन म्हापसा नगरपालिकेचे नगरसेवक ॲड. तारक आरोलकर यांनी व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर सरपंच अनुपमा मयेकर, उपसरपंच सोनाली माज्री, पंच सांतान फर्नांडिस, देवस्थानचे अध्यक्ष राजेश गोकर्णकर, महिला समिती अध्यक्ष अर्चना खोर्जे, सुशांत तुळसकर उपस्थित होते. प्रारंभी आमदार जीत आरोलकर हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. स्व अमर बांदेकर व स्व उल्हास गोकर्णकर यांना आदरांजली वाहण्यात आली. देवस्थान समितीचे शिशिर गोकर्णकर, नागेश गोकर्णकर, बाबलो उगवेकर,मिथुन तांडेल आदींनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी ज्येष्ठ विद्याधर तांडेल,एकनाथ बांदेकर,विठोबा खोर्जे, पुरुषोतम

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २१५ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 215 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .